महाराष्ट्र शासन

गडचिरोली प्रादेशिक वनवृत्त

# बांबु

## वनस्पती शास्त्र

## आणि

## कापणीचे नियम


**टि.एस.के.रेड्डी**

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)

गडचिरोली


---


* संकलन व रचना *

**श्री डि.पी.दहाट**

विभागीय वन अधिकार (तेंदू)

**श्री एस.जी.मैन्द**

लेखापाल


Scanned by CamScanner

## प्रस्तावना :

भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २(४) नुसार बांबू हे वनात उपज झालेले असले किंवा वनाचे बाहेरील उपज झालेले असले तरीही त्यास वनोपज संबोधलेले आहे. बांबू हे वनोपज असल्यामुळे त्याचे तोडीवर, वाहतुकीवर वनविभागाचे नियंत्रण आहे. पंचायत विस्तार अधिनियम (PESA) १९९६ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील मोहफुले, मोहाटोळी, लाख, पळस, गोंद, मध इ. ३३ प्रकारचे गौण वनोपजांचे मालकी हक्क ग्रामसभांना सन १९९६ पासून देण्यांत आलेले आहे. दिनांक १९.८.२०1४ ला मा.राज्यपाल महोदयांनी अधिसुचना जारी करून सदर ३३ वनोपजांची यादी रद्द करून तेंदू व बांबू यांसह सर्वच प्रकारचे गौण वनोजांची मालकी ग्रामसभांना दिलेली आहे.

यापुर्वी ३३ गौण वनोपजांची मालकी ग्रामसभांना देण्यांत आलेली असली तरी काही कारणांमुळे सदर ३३ गौण वनोपजांचे संकलन, विक्री व विल्हेवाट इ.कामे ग्रामसभांनी केलेली नाही. परंतु बांबू हे प्रमुख वन उत्पादन असून यापासून मोठ्या प्रमाणात रोजगार व स्वामीत्व शुल्क मिळत असल्यामुळे ग्रामसभांना मुबलक निधी मिळणार आहे. त्यामुळे बांबूची तोड करणे आवश्यक आहे.

बांबू हे विशिष्ट प्रकारचे वनोपज आहे. सर्वसाधारणपणे बांबूचे झाड हे बेटाचे (रांझीचे) स्वरूपात वाढते. बांबू रांझीचे आयुर्मान साधारणतः ८० वर्षाचे असते.

Scanned by CamScanner

बांबूच्या रांझीमधुन पावसाळ्यात जुलै/ऑगष्ट च्या दरम्यान बांबूचे कोंब (वास्ते) निघतात. बांबूच्या कोंबाची २ ते ३ महिण्यात पुर्ण वाढ होते. हे कोंब ३ वर्षानंतर परिपक्व बांबू तयार होतात.

त्यामुळे बांबूची तोड करण्यासाठी वनविभागाने दर तिन वर्षाचे चक्राने तोडीची योजना तयार केलेली आहे. त्यास कार्यआयोजना असेही संबोधले जाते. परिपक्व बांबूचे शास्त्रशुध्द पध्दतीने उत्पादन घेतल्यास बांबूपासून चांगले उत्पन्न मिळते व बांबूच्या रांझीच्या विकास/विस्तार देखिल साधता येतो. मात्र रांझीतील बांबूची अवास्तव तोड केली तर बांबूच्या रांझीतील कंदास इजा होवून बांबू रांझी नष्ट होण्याचा धोका असतो.

आता अनुसूचित क्षेत्रातील बांबूची मालकी ग्रामसभांना देण्यांत आलेली असल्यामुळे बांबूची जोपासणा करणे, बांबूपासून गावांस चांगले उत्पन्न नेहमी करता मिळणे आवश्यक असल्याने ग्रामसभांच्या व ग्रामस्थांच्या माहितीसाठी हे पुस्तक प्रकाशीत करण्यांत येत आहे.

***

Scanned by CamScanner

# प्रकरण - 9

## बांबूचे वनस्पती शास्त्र

बांबू हे एक प्रकारचे उंच व जलद वाढणारे गवत असून ते विशेष प्रकारचे लाकुड आहे. बांबू वनस्पती ही एक संमिश्र रचना आहे त्यात एकसारख्या रचनेचे शाकीय अक्षांचे दोन संच असतात. एक जमिनीच्या वर आणि दुसरा जमिनीच्या खाली असतो.

* जमिनीवरील प्राथमिक अक्ष हा संलग्नित, उंच दंडगोलाकार खोडांचा बनलेला असतो त्यांना बांबू बेट (रांझी) असं म्हणतात. फांद्या जमिनीवरील दुय्यम अक्षांच्या स्वरूपात असतात.

* जमिनीखालील भाग हा एक सुदृढ कंद असून त्यावर मुळे आणि डोळे असतात.

रांझी (Clump)



बांबू दोन प्रकारचे असतात. रांझी करून वाढणारे आणि एकेरी वाढणारे बांबू. एक रांझी म्हणजे बांबूच्या खोडांचा एक समुच्चय किंवा समुह असतो. रांझी करून वाढणारे किंवा सिम्पोडीयल बांबू भारतासारख्या उष्णप्रदेशिय देशांमध्ये सर्रासपणे आढळतात. एकेरी बांबू किंवा

Scanned by CamScanner



एकमेकांपासून काही अंतरावर वाढणारे बांबू समशीतोष्ण प्रदेशामध्ये प्रामुख्याने आढळतात. बांबूची रांझी ही एखाद्या बिजापासून अथवा रोपट्यापासून निर्माण होते. किंवा रांझीचा कापलेला हिस्सा किंवा विभाजीत भाग अभिवृध्दीकरता मातृवृक्षाच्या स्वरूपात वापरल्यास त्यापासून रांझी तयार होते.

बांबूची एक रांझी ४ ते ६ वर्षात परिपक्व होते. दरवर्षी ते वाढत्या उंचीचे आणि जाडीचे बांबू निर्माण करते. रांझीमध्ये असे अनेक बांबू घट्टपणे एकत्रित असू शकतात.

## बांबू (Clum)

बांबूचा पेरा, विशेषत्वाने पोकळ दंडगोलासारखा असतो जो टोकाकडे बारीक आणि निमुळता होत जातो. हा भाग बांबूचा सर्वाधिक दृश्य आणि सहजपणे ओळखता येणारा असा असतो. तसेच ह्याचा वापर सर्वाधिक होतो. बांबूच्या पेरांचा अनेक प्रकारे वापर करून बनविलेल्या वस्तुना बाजारात मागणी असते.

बांबू पेरा हा जमिनीपासून एक कोंबाच्या रूपात प्रकटतो नंतर त्याची वाढ

Scanned by CamScanner

झपाट्याने होते आणि तो टणक बनतो. त्यांची संपूर्ण वाढ आणि जाडी ८० ते ११० दिवसांत पूर्ण होते. हा पेरा चौथ्या वर्षात पक्व होतो. तोपर्यंत त्याची मजबुती देखील सर्वोच्च स्तरावर पोचलेली असते पाचव्या वर्षानंतर तो कमकुवत व्हायला लागतो.

बहुतांश बांबूचे पेरे हे हिरव्या रंगाचे असतात. मात्र पिवळा, काळा तांबरट किंवा काळा अशा रंगाचेही बांबू असतात. काही बांबूचा पिवळ्या किंवा हिरव्या रंगाचे पट्टे असतात. अनेक जातीमध्ये पेरा पक्व होत जातो त्यानुसार रंगाच्या छटा बदलत जातात.

### कोंब (Shoot)

बांबूचा कोंब म्हणजे उमलणारे खोड किंवा पेरा असतो. जमिनीखालील कंदावरील डोळ्यातून याचा उगम होतो. हा कोंब जेव्हां जमिनीला भेदून बाहेर येतो तेव्हां तो पूर्ण तयार झालेला असतो. त्यावर पेरे आणि आंतरपेरे असतात. आणि तो एका सुरक्षात्मक आवरणामध्ये घट्टपणे बसविलेला असतो. एकदा तो जमिनीच्या बाहेर आला की, जीवरासायनिक प्रक्रियांच्यामुळे तो झपाट्याने वाढतो आणि एका टणक बाबुचे रूप घेतो.



Scanned by CamScanner

## पेरं आणि आंतरपेरं :

बांबूचा कंद, बांबू आणि फांद्या यावर मजबूत पेरांद्वारे भाग पाडले जातात. ही पेरं म्हणजे बांबूच्या वाढीच्या दृष्टीने महत्वाचे टप्पे असतात आणि इथुनच नविन फांद्या फुटून विकसीत होतात.

दोन लागोपाठच्या पेरांमधील भागाला आंतरपेर म्हणतात. ही आंतरपेरं सामान्यतः पोकळ असतात पण नेहमीच असतात असे नाही. त्यांच्या वाढीच्या प्रारंभीच्या काळात त्यांच्यावर आवरण असतात. बांबू पक्व होत जाईल तशी ही आवरणं गळून पडतात. विविध बांबूच्या जातीप्रमाणे या आंतरपेरांच्या लांबीमध्येही बराच फरक असतो. ही लांबी ५ ते ६० हुन जास्त सेंटीमिटरपर्यंत असू शकते. सामान्यतः आंतरपेराची लांबी जमिनीलगत उर्ध्व दिशेनं खालच्या भागाकडून मध्यापर्यंत वाढत जाते आणि नंतर कमीकमी होते.

## फूटवे आणि फांद्या :

बांबूवरील आंतरपेरांना फांद्याचे फुटवे येतात. ते बांबूच्या एकाआड विरूध्द बाजूंना फुटतात. एखाद्या पेराच्या ठिकाणी असलेल्या फुटव्याची संख्या ही त्या ठिकाणच्या संभाव्य फांद्याशी निगडीत असते. कंदाच्या पेरांवरही फुटवे येतात ते नंतर जमिनीवर येऊन त्यांचे बांबू बनतात.



## कंद (Rhizome)

कंद हा विस्तार जमिनीच्या खाली वाढणारा भाग असतो. बांबूच्या रचनेचा तो पाया असतो. जमिनीखाली त्याची वाढ समांतर पध्दतीने होते. त्यानंतर जमिनीवर येऊन नव्या बांबूमध्ये परिवर्तीत होतात. बांबूच्या पेरांच्या तुलनेत कंदावरील पेरं दाटीवाटीने असतात. बांबू आणि फांद्याप्रमाणेच कंदावरील पेरांनाही एक सुरक्षात्मक आवरण असते

कंदाचे प्रामुख्याने दोन प्रकार असतात.



* रांझी करून वाढणारे कंद
* एकेरी कंद–रांझी न बनवणरे,आडव्या दिशेने वाढणारे

बहुतांश भारतीय बांबूना स्थुलस्वरूपातील कंद असतात आणि त्यामुळे त्यांची रांझी बनते. काही बांबूच्या कंदामध्ये दोन्ही प्रकारचे गुणधर्म आढळतात. त्यांना उभयरूप कंद म्हणतात.



मुळे जमिनीमध्ये घट्ट रोवून उभे राहण्यासाठी मदत करतात आणि पाणी तसेच अन्नघटक बांबूच्या विविध भागापर्यंत वाहून नेणे आणि त्यांचे वितरण करणे त्यामुळे शक्य होते. जमिनीच्या आंत असणाऱ्या कंदावरील आणि बांबूवरील पेरांमधून ही मुळे फुटतात. काही जातींमध्ये मुळे ही बांबू आणि फांद्याच्या जमिनीवरील भागातूनही फुटतात.

Scanned by CamScanner

## पाने (Leaves)

बांबूच्या फांद्यावर पाने येतात. सुर्यप्रकाशाच्या विश्लेषणात त्यांची महत्वाची भूमिका असते. पाऊस आणि दवांपासून पाने बांबूचे रक्षण करतात.

बहुतांश बांबुना भरपूर पाने येतात जी दरवर्षी गळून जमिनीवर पडतात. त्यामुळे सेंद्रीय पदार्थांचा जाड स्तर जमिनीवर साचतो. चारा म्हणूनही त्यांचा चांगला उपयोग होतो.

## फुले आणि फुलोरा



बांबुची पाने ही रंग, आकार आणि अन्य वैशिष्ट्यांच्या बाबतीत वैविधपूर्ण असतात. विशेष प्रकारच्या पानांचे पुंजके वाढू लागल्यानंतर आणि पुनरूत्पादन प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या विशिष्ट उद्देशाने बांबूला फुलोरा येऊ लागतो.

फुलोरा अनिश्चित प्रकारे आणि दिर्घ काळानंतर येत असल्यामुळे त्याचा अभ्यास सुसंगतपणे होऊ शकत नाही. फुलोऱ्याचे चक्र एक वर्ष ते १०० वर्षाहुन अधिक काळ असे विविध कालावधीचे असू शकते. फुलोरा दोन प्रकारचा असतो.

* सार्वत्रिक फुलोरा : एका पट्ट्यातील सर्वच बांबूना ठराविक कालावधीत फुलोरा येतो आणि नंतर ते बांबू मरतात.

Scanned by CamScanner

* तुरळक : एका पट्टयातील काही अक्षांना फुलोरा येऊन नंतर ते मरतात. असा तुरळक फुलोरा हा मोठ्या बांबू मळ्यांमध्ये किंवा छोट्या संख्येतील बांबूमध्ये येऊ शकतो. काही बांबूना तुरळकपणे दरवर्षी फुलोरा येण्याची नोंद आहे.

बांबुच्या अशा काही जाती आहेत ज्यांना दोन्ही प्रकारचा फुलोरा येतो. उदा.डेन्ड्रोकॅलामस हॅमिल्टोनीई प्रकारच्या बांबूच्या काही बांबूना विविध ठिकाणी तुरळक फुलोरा येतो. तर याच जातीला ३० ते ४० वर्षाच्या खंडानंतर मोठ्या पट्टयामध्ये सार्वत्रिक फुलोरा येतो.

****

Scanned by CamScanner

## प्रकरण - २

### दाटीवाटीतल्या बांबूची कापणी :

बांबूचे रांझ्या अनेक कारणांमुळे दाटीवाटीने होऊ शकते. त्यापैकी मुख्य कारण म्हणजे, रांझीची मशागत केलेली नसल्यास, किंवा १ ते २ वर्षे ज्याची कापणी केलेली नसावी. वनजमिनीवरील बांबूच्या बाबतीत असं होत असतं. त्या ठिकाणी कापणी किंवा स्वच्छतेचे काम ४ वर्षातुन एकदा किंवा त्याहुन अधिक काळाच्या खंडानंतर केलं जातं.


बाम्बूसा बांम्बोस, बाम्बुसा बल्कुआ आणि डेंड्रोकॅलामस स्टीक्टस यांसारख्या काही बांबूच्या जातींमध्ये रांझीतील बांबू अगदी जवळजवळ उगवतात. अशा स्थितीत रांझीमध्ये दाटीवाटी होण्याची शक्यता जास्त असते. याशिवाय बाम्बूसा बांम्बोसच्या फांद्या काटेरी असतात. त्यामुळे रांझीत काम करणं आणखी अवघड होऊ शकतं. अशा स्थितीमध्ये बांबू काढणी/कापणीसाठी बोगदा किंवा घोड्याची नाल या पध्दतीचा वापर करणं आवश्यक ठरतं.





Scanned by CamScanner

## कापणीची घोड्याच्या नालेची पध्दत (हॉर्स शू) पध्दत



रांझीतील गर्दी केलेल्या बांबूच्या विरूध्द ठिकाणी जागा मोकळी करून खालील आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे घोडा नाल पध्दतीने रांझीतील बांबू कापणीचे काम केले जाते.

सर्व जुने, वाळलेले आणि सडलेले बांबू काढून टाकून केवळ १ वर्ष जुने जोमाने वाढणारे बांबू आणि त्यांच्या सोबत एकसारख्या अंतरावरील तसेच सुदृढ जुने बांबू योग्य त्या संख्येने राखले जातात.

या प्रकारच्या कापणीच्या पध्दतीवर प्रारंभी बराच खर्च येतो आणि काही पक्व तसेच अपक्व बांबू काढून टाकावे लागतात. परंतु त्यामुळे दाटीवाटी होत नाही आणि कोंब तसेच बांबूच्या योग्य वाढीला पुरेशी जागा उपलब्ध होते. नंतरच्या वर्षामध्ये रांझीमध्ये काम करण्यासही सुलभता प्राप्त होते.

***

Scanned by CamScanner

# प्रकरण - ३

## बांबू तोडीचे नियम :

१. १५ जून ते १५ सप्टेंबर (Period of formation of new clums) या कालावधीत नविन बांबू निर्माण होऊन त्याचे वाढ होते. त्यामुळे या कालावधीत बांबूची तोड प्रतिबंधीत आहे.

२. बांबूची कुप डेपोवर वाहतुक व विक्री पावसाळ्यापुर्वी करण्यासाठी शक्यतो मार्च महिण्याचे अखेरपर्यंत बांबूची तोड पूर्ण करण्यात यावी. नियमानुसार १५ जून पर्यंत तोड करता येवू यकते.

३. रांझीमधील बांबूची कापणी करण्यापुर्वी रांझीची स फ ा ई करणे आवश्यक आहे. रांझी सफाई करतांना रांझीतील खालील सर्व बांबू काढण्यात यावे.

अ) सर्व मेलेले, रोगट व सुकलेले बांबू काढावे.

ब) अर्धवट किंवा जास्त तुटलेले व नुकसान झालेले बांबू काढावे.

क) वेडीवाकडी व पिरगळलेली बांबू काढणे.

४. बांबूची पुर्ण वाढ पहील्या वर्षीच होते. परंतु दोन वर्ष वयाचे खालील बांबू अपरिपक्त (कोवळे) असतात. त्यामुळे रांझीतील दोन वर्षाचे खालील बांबूची तोड प्रतीबंधीत आहे.

Scanned by CamScanner


५. रांझीतील बांबूची तोड करतांना पुर्ण वाढ झालेले बांबू मधून खालील प्रकारचे बांबू (हिरवे व जीवंत) राखून ठेवावीत.

अ) चालू वर्षातील (एक वर्ष पेक्षा कमी वयाचे) सर्व बांबू राखून ठेवावे.

ब) दुसऱ्या वर्षाचे (दोन वर्ष वयाचे) सर्व बांबू रांझीमध्ये राखून ठेवावे.

क) प्रथम वर्षातील बांबू इतके किंवा कमीत कमी आठ बांबू ह्यापैकी जी संख्या जास्त असेल तेवढे बांबू दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे बांबू मधून राखून ठेवावे. व उर्वरीत बांबूची कापणी करावी.

## बांबू खळा कापणीची योग्य पध्दत :




६. बांबू रांझीचे बुडाच्या पहिल्या पेराच्या (खळ्यांच्या) वर (First Iternode) व जमिनीपासून १५ सें.मी. उंचीवर आणि जास्तीत जास्त ४५ सें.मी. च्या खाली तिक्ष्ण धारेचे शस्त्र कुऱ्हाड किंवा कोयता वापरून बांबू तोडावा जेणेकरून बांबू फाटणार नाही.

Scanned by CamScanner

७. ज्यावर्षी बांबू रांझीला फुलोरा आला असेल त्यावर्षी त्या रांझीमधील बांबू तोडू नये. बिज झडल्यानंतर बिजापासुन नविन बांबूचे रोप तयार होतात व कालांतराने नैसर्गीकरित्या त्याचे रांझीमध्ये रूपांतर होते. बिज झडल्यानंतर दुसऱ्या वर्षात फुलोरा आलेली संपुर्ण रांझीची कापणी करावी.

८. बांबू रांझीमध्ये १२ पेक्षा जास्त परिपक्व बांबू (एक वर्ष व दोन वर्ष वयाची धरून) असतील तेंव्हा त्या रांझीमधील बांबू तोडता येईल. रांझीमध्ये १२ पेक्षा कमी बांबू असल्यास फक्त तुटलेले, मेलेले, सुकलेले व जास्त नुकसान झालेले किंवा अति परिपक्व व दाटी निर्माण करणारे बांबू तोडावे.

९. बांबू रांझीची साफतोड (पुर्ण बांबूची तोड) करण्यात येवू नये. रांझीमध्ये कमीत कमी ८ बांबू राखून ठेवणे आवश्यक आहे.

१०. बांबू तोड करतांना रांझीचे बाहेरील भागात (Periphery) परिपक्व व राखून ठेवलेले बांबू कोवळ्या बांबूला आधार देण्यासाठी समान अंतरावर राहील याची काळजी घ्यावी. रांझीचे आंतमध्ये सहजरित्या बांबू तोड करण्यासाठी निकडीचे असेल तेंव्हाच रांझीचे बाहेरिल भागातील बांबू काढता येईल.

Scanned by CamScanner

११. बांबू रांझीचे बाहेरील भागातील अग्रणी बांबू कोणत्याही परिस्थितीत (वेडीवाकडी असेल तरी) तोडू नये. बांबू रांझी व मुळाचे पुढील वाढीसाठी तसेच नविन बांबूला आधार देण्यासाठी ते राखून ठेवावेत.

१२. बांबू तोड करतांना खालील बाबी सक्तपणे प्रतिबंधित आहेत.

अ) बांबूचे मुळे (Rhizome) खोदणे.

ब) वैरणासाठी बांबू तोडणे.

क) कोवळा बांबू (Tender Bamboo) मोळी बांधणीसाठी वापरणे.

ड) आदल्या वर्षी काम केलेले बांबू क्षेत्र चालू वर्षाचे पावसाळ्यात चराईसाठी बंद ठेवावे.

१३. लगतचे बांबू रांझीचे परीघ वेगवेगळे दिसून येत असल्यास त्यास स्वतंत्र्य रांझी समजाव्यात. एक मिटर परिसरातील बांबूचे रांझीस एकच रांझी समजण्यात यावी.

१४. बांबू रांझीचे परिघातील मुळे (Rhizome) उघडी पडली असल्यास त्यांचे पोषण, वाढ व विस्तार होण्यासाठी मातीने झाकावीत.

१५. बांबूचे वाढीस अडथळा निर्माण करणाऱ्या वेली तोडण्यात याव्यात. तोडीनंतर काडी, कचरा, पाला, पाचोळा रांझीपासून दोन मिटर अंतरावर काढून टाकावा.

Scanned by CamScanner

## रांझीमधुन तोड करावयाचे व राखून ठेवावयाचे बांबूची संख्या खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

### तक्ता - १

| रांझीतील बांबूची संख्या | | | | ३ऱ्या वर्षाचे राखून ठेवावयाचे बांबू | तोड करावयाचे बांबू | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ल्या वर्षाचे बांबू | २ऱ्या वर्षाचे बांबू | ३ऱ्या वर्षाचे बांबू | वाळलेले बांबू | | ३ ऱ्या वर्षाचे | वाळलेले बांबू |
| २ | २ | ३ | १ | ३ | ० | १ |
| ३ | ५ | ७ | ३ | ३ | ४ | ३ |
| १२ | ६ | ७ | ४ | ६ | १ | ४ |
| ३ | ६ | १५ | २ | २ | १३ | २ |
| ११ | १५ | १४ | ५ | ० | १४ | ५ |
| २ | २ | ११ | ७ | ६ | ५ | ७ |
| ५ | १२ | ४ | ३ | ० | ४ | ३ |
| ६ | ८ | २ | ५ | ० | २ | ५ |

Scanned by CamScanner

# प्रकरण - ४

## बांबूची साठवण



कापणी केलेले बांबू कुपाच्या ठिकाणी अथवा डेपो वर काही काळपर्यंत उभ्या अवस्थेत साठवून ठेवावे लागतात. पुढीलपैकी कोणत्याही कारणासाठी हे आवश्यक ठरते. बाजारपेठेत एकदम मोठ्या संख्येने पुरवठा करणे, चांगली किंमत येईतोवर साठा करून ठेवणे, त्यांचे जतन आणि प्रक्रिया करणे.

कापणीपश्चात लगेच आणि साठवणुकीच्या काळादरम्यान बांबू हे उभेच जमवून ठेवावेत. आडवे साठवून ठेवल्यास सर्वात खालच्या बांबूवर दबाव येऊन ते वेडेवाकडे होतात. किंवा तुटू शकतात

हिरव्या बांबूची उभ्या अवस्थेत साठवण करणे उत्तम कारण त्यांचा बराचसा पृष्ठभाग मोकळा राहतो. तसेच पावसाळी पाणी झिरपून जात असल्याने बांबू खराब होत नाही आणि मातीशी संपर्क न आल्यामुळे भुंगे आणि वाळवीचा प्रादुर्भाव होत नाही.



Scanned by CamScanner

कमी प्रमाणात बांबू असल्यास वरिल प्रमाणे उभी साठवण करणे शक्य आहे. परंतु जास्त प्रमाणात बांबू असल्यास बांबूची आडवी थप्पी लावून साठवण केली जाते.

आगारात विक्री करीता वेगवेगळ्या गोलाई (वेढी) वर्ग व लांबी वर्गात साठवणुक केली जाते.

वेढीवर्ग

९सें.मी. च्या आतील,

९ ते १२सें.मी.,

१२ ते १८ सें.मी.

१८ ते २१ सें.मी.

२१ सें.मी. च्या वरील

लांबी वर्ग

३ मीटर च्या आतील,

३ ते ४ मीटर,

४ ते ५ मीटर,

५ ते ६ मीटर,

६ ते ७ मीटर,

७ ते ८ मीटर,



Scanned by CamScanner

# चुकीच्या पध्दतीने तोडलेल्या बांबूचे छायाचित्रे





Scanned by CamScanner





लक्षात ठेवा :- रांझीमधुन शास्त्रोक्त पध्दतीने उत्पन्न घेतल्यास दरवर्षी बांबू मिळेल, परंतु अशा चुकीच्या पध्दतीने बांबूची कापणी कराल तर आपल्या जंगलातील बांबूची रांझी नष्ट होईल.

*****


संकलन व रचना

**श्री डि. पी. दहाट,** विभागीय वन अधिकारी (तेंदू)

**श्री एस. जी. मैन्द,** लेखापाल


Scanned by CamScanner

## अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) बांबू कापणी व विक्रीच्या व्यवस्थापनाबाबत निर्णय घेण्यासाठी ग्रामसभा आयोजीत करून योग्य तो निर्णय घेणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : पेसा-२०१२/प्र.क्र.६५/पंरा-२

२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड फोर्ट, मुंबई-४०० ००१

तारीख : ३१ मार्च २०१५

**प्रस्तावणा :**

अनुसूचित (पेसा) क्षेत्रातील आदिवासींच्या हिताच्या व कल्याणाच्या दृष्टीने मा.राज्यपाल महोदयांनी दि.१९/८/२०१४ रोजीच्या अधिसुचनेअन्वये महाराष्ट्र वन उत्पादन (मालकी हक्कांचे हस्तांतरण) अधिनियम, १९९७ मध्ये सुधारणा केली असुन त्यानूसार अनुसूचित क्षेत्रात गौण वनउपजांच्या व्याख्येमध्ये सुधारणा केली आहे. त्यामध्ये बांबूचा समावेश केला आहे. त्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील गौण वनउपजांची मालकी ग्रामसभेकडे/ पंचायतीकडे विहीत करण्यात आली आहे, आणि यापुर्वी तेंदुपत्त्याबाबत दि.१९ जानेवारी २०१५ व दि.१६ फेब्रुवारी २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.



Scanned by CamScanner

दि.३० ऑक्टो. २०१४ च्या अधिसुचने अन्वये भारतीय वन अधिनियम १९२७ मध्ये सुधारणा करून गौण वन उत्पादनासाठी वाहतुक परवाना (Transit Permit)देण्याचे अधिकार ग्रामसभांना देण्यात आलेले आहेत.

गेली अनेक वर्षे वन विभागाकडुन बांबूची कापणी केली जात होती व त्यासाठी वन विभागाने एक प्रमाणित पध्दत निश्चित केलेली आहे. प्रथमतःच वन विभागाकडुन हे अधिकार पंचायतीकडे देण्यात आलेले आहेत. हा मोठा बदल आहे.

नैसर्गीक साधन संपत्तीच्या व्यवस्थापनासाठी, पेसा नियमातील नियम-४ नुसार ग्रामसभा स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू असुन, अदयापपर्यंत अशा ग्रामसभांची पुर्णपणे स्थापना झोलेली नाही.

बांबूची कापणी वनविभागाच्या कार्यपध्दतीच्या (Working Plan) अधिन राहून पेसा नियम-४१(५) प्रमाणे आवश्यक राहील.

दि.१९ ऑगस्ट २०१४ व दि.३० ऑटोबर २०१४ च्या अधिसुचनांची परिणाम कारक अंमलबजावणी करण्यासाठी व पंचायत आणि ग्रामसभांच्या गौण वनउत्पादनाच्या मालकीच्या संदर्भात कोणतीही तडजोड न करता यासंदर्भातील कार्ये पार पाडण्यासाठी खालील मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येत आहेत.



Scanned by CamScanner

**शासन निर्णय :**

या पाश्वीमीवर, या वर्षीच्या बांबू हंगामास संक्रमण वर्ष म्हटले जाईल. या मार्गदर्शक सुचना यावर्षीच्या पावसाळा सुरू होण्यापुर्वीच्या हंगामासाठी लागु राहतील. हा हंगाम संपल्यानंतर त्याचा येणारा अनुभव विचारात घेवुन सर्व समावेश सुचना निर्गमित करण्यात येतील.

सन २०१५ चा पावसाळा सुरू होण्यास आता कमी कालावधी उरलेला असल्याने, यावर्षी बांबूची कापणी करण्यासाठी मर्यादित अवधी शिल्लक आहे. त्यामुळे ज्या पेसा क्षेत्रामध्ये या हंगामात व वनविभागाच्या कार्यपध्दतीनुसार (Working Plan) बांबू कापणीयोग्य झाला आहे अशा विशेष क्षेत्रांची/ गावांची/ पंचायतींची संबंधित जिल्हयाचे मुख्य वनसंरक्षक/ उपसवनसंरक्षक यांनी निवड करावी आणि त्याची माहिती तात्काळ संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत-पेसा सेल) व स्थानिक गट विकास अधिकाऱ्याला दयावी.

एखाद्या गावी किंवा पंचायतीमध्ये बांबू कापणी योग्य आहे परंतु वनविभागाने सदर गावाची/पंचायतीची निवड केलेली नाही किंवा सदर गाव/पंचायत अधिसूचित केलेले नसेल तर ग्रामसभेला

Scanned by CamScanner

जिल्हास्तरीय मार्गदर्शन व तक्रार निवारण समितीकडे आपली भुमिका मांडता येईल. व त्यावर जिल्हास्तरीय मार्गदर्शन व तक्रार निवारण समिती योग्य तो निर्णय घेईल आणि समितीचा निर्णय अंतीम राहील.

अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्र) बांबू क्षेत्र असलेल्या गावातीलग्रामसभा आणि पंचायत कोणत्या पध्दतीने बांबूची कापणी व विक्री यांची विल्हेवाट लावू इच्छिते यासाठी विचार विनियम करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या-त्या ठिकाणी तात्काळ विशेष ग्रामसभेचे आयोजन करावे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ७(१) मधील तरतूदींनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हे अनुसूचित क्षेत्रातील संबंधित ग्रामपंचायतींना विशेष ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश देतील.

सदर ग्रामसभा तातडीने घेणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत (ग्रामसभेच्या बैठकी) नियम,१९५९ मधील नियम ५ अंतर्गत असलेल्या तरतूदीनुसार अशी ग्रामसभा चार पूर्ण

Scanned by CamScanner

दिवसांच्या अल्प सूचनेद्वारे (NOTICE) बोलविण्यात यावी असे निर्देर्शित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र वन उत्पादन (मालकी हक्कांचे हस्तांतरण) अधिनियम,१९९७ च्या तरतुदी व त्यामधील बदल, गौण वन उत्पादनाची व्याख्या या सर्व बाबी ग्रामसभेमध्ये सोप्या भाषेत समजावुन सांगण्यात याव्यात.

बांबूची कापणी व विक्री या संदर्भात ग्रामसभेस खालील दोन पर्यायांमधुन एका पर्यायाची निवड करता येईल. यासाठी ग्रामसभेचे मत / अभिप्राय ठरावाच्या स्वरूपात घेण्यात यावे. जसे की-

पर्याय १. ग्रामसभा वनविभागाच्या सेवा प्राप्त करून धेवून या हंगामासाठी वन विभागाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे वनविभागाने बांबूची कापणी व विक्री करावी व यापासून येणारे उत्पन्न वन विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या खात्यावर जमा करावे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर रक्कम संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभाकोष खात्यावर जमा करावी.

Scanned by CamScanner

लिलाव करण्याअगोदर, स्थानिक गरजा व पारंपारिक व्यवसाय करणाऱ्यांच्या गरजा/निस्तार हक्क विचारात घेवून निर्णय घेईल व त्यानंतर शिल्लक राहीलेला बांबूचा लिलाव करेल.

किंवा

पर्याय २. ग्रामसभा स्वतः आवश्यकतेनुसार संबंधित विभागांचे तांत्रिक सहाय्य घेवून, वनविभागाची कार्यपध्दती अनुसरून बांबूची कापणी, विक्री करू शकतात.

मार्गदर्शक सूचना - पर्याय २ निवडल्यास खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

* याप्रकरणी ग्रामसभा,ठरावांसह बांबू कापणीचे/बांबू मिळविण्याचे परंपारागत क्षेत्र व त्याची रद्द निश्चित करील.

* एखाद्या प्रकरणी, शेजारील गावाबरोबर हद्दीबाबत/क्षेत्राबाबत विवाद निर्माण झाल्यास गट विकास अधिकारी/विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) वन विभागाशी विचार विनिमय करून हद्द शिश्चित करील.

* परंपरागत क्षेत्राची हद्द ठरविल्यानंतर ज्या क्षेत्रात कार्ययोजनुसार (Working Plan) बांबू कापणीसाठी उपलब्ध असेल त्या क्षेत्रात ग्रामस्थ, तंत्रशूध्द पध्दतीने वनविभागाच्या

Scanned by CamScanner

मार्गदर्शनाखाली बांबूची कापणी करतील. संबंधित गावातील/ग्रामपंचायतीतील ग्रामस्थानांच फक्त बांबू कापणीसाठी परवानगी देण्यात येईल. बांबू कापणीची कंत्राटदारांना परवानगी देण्यात येणार नाही.

* कापणीसाठी येणारा मजुरांचा खर्च ते स्वत: भागवतील आणि जेथे-जेथे शक्य आहे तेथे आदिवासी विकास विभाग/आदिवासी विकास महामंडळ या उद्देशासाठी फिरता निधी उपलब्ध करून देतील. मानव विकास मिशन व इतर तत्सम योजनांखाली असलेला निधी यासाठी उपलब्ध करून देता येईल. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली समिती ग्रामपंचायतीला मार्गदर्शन करेल व यासंदर्भात योग्य तो निर्णय घेईल.

* पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या अधिकाऱ्याच्या उपस्थितीत ग्रामसभा बांबूची लिलाव पध्दतीने विल्हेवाट लावतील. लिलाव करण्याअगोदर, स्थानिक गरजा व पारंपारिक व्यवसाय करणाऱ्यांच्या गरजा/निस्तार हक्क विचारात घेवून निर्णय घेईल व त्यानंतर शिल्लक राहीलेला बांबूचा लिलाव करेल.

* ग्रामसभेने बांबू कापणी,विक्री वा विल्हेवाटासाठी आदिवासी विकास विभाग अथवा संबंधित विभागाकडून आगावू

Scanned by CamScanner

रक्कम घेतलेली असेल तर पंचायतीचा संबंधित अधिकारी अशी रक्कम वजा करून घेईल आणि संबंधित विभागाला परत करेल.

* ग्रामसभेने कापणी केलेल्या बांबूची साठवणूक करण्यासाठी वनविभाग, जिल्हा परिषद, आदिवासी विकास विभाग अल्पदराने आपली आगारे (Depots) उपलब्ध करून देतील.

ज्या ग्रामसभा पर्याय-२ निवडतील त्या वाहतूक परवाना (Transit Permit) देण्यास सक्षम असतील आणि वाहतूक परवाना पुस्तक (Transit Permit Book) वन विभागाकडून उपलब्ध करून घेण्यात येईल.

४. ज्या ग्रामसभा कोणताही ठराव करणार नाहीत त्यांनी पर्याय-२ (दोन) ची निवड केली असे समजण्यात येईल.

५. जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समिती.

ग्रामसभा अथवा ग्रामसभेने नियुक्त केलेले प्रतिनिधी अथवा समितीच्या काही तक्रारी/अडीअडचणी असतील तर ते जिल्हास्तरीय मार्गदर्शन व तक्रार निवारण समितीकडे अर्ज करू शकतील.

Scanned by CamScanner

जिल्हास्तरीय मार्गदर्शन व तक्रार निवारण समिती खालील प्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | -अध्यक्ष |
| २. मुख्य वन संरक्षक | -सह-अध्यक्ष |
| ३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | -सदस्य |
| ४. उप वन संरक्षक | -सदस्य |
| ५. प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभाग | -सदस्य |
| ६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | -सदस्य सचिव |
| ७. जिल्हाधिकारी यांनी निवडलेले ग्रामसभेचे तीन सभासद | -सदस्य |
| ८. जिल्हाधिकारी यांनी निवडलेले सामाजिक संघटनेतील दोन प्रतिनिधी | -सदस्य |

जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समिती या शासन निर्णयाची अंमलबजावणी करतांना येणाऱ्या सर्व अडीअडचणी सोडविण्यासाठी आवश्यक ती पावले उचलेल. मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर सर्व प्रकारच्या मार्गदर्शक सुचना देईल.

६. ग्रामसभांना सुयोग्य (लाभदायक) निर्णय घेण्यासाठी संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी/पंचायत समितीचे अधिकारी/कर्मचारी योग्य ते मार्गदर्शन व मदत करतील.

सदर शासन निर्णय वन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.com या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३२६१५४४३०७४२०, असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

## ठराव क्र.१ – (पर्याय–१)

ज्याअर्थी बांबूसह सर्व गौण वनउत्पादनांची मालकी पंचायत आणि ग्रामसभेकडे विहित करण्यात आली आहे.

आणि ज्या अर्थी सन २०१५ चा पावसाळा सुरु होण्यास आता कमी कालावधी उरलेला असल्याने, या वर्षी बांबूची कापणी करण्यासाठी मर्यादित अवधी शिल्लक आहे.

म्हणून आम्ही ग्रामसभेचे मतदार, बांबूची कापणी/ विक्री/ वाहतूक आणि विल्हेवाट करण्यासाठी आमच्या वतीने वनविभागास प्राधीकृत करीत आहोत.

आम्ही बांबू कापणी/विक्रीची अंतिम विल्हेवाट लावण्याच्या संपूर्ण प्रक्रियेचे नियंत्रण, पर्यवेक्षण करण्यासाठी ग्रामसभेतील/साधन संपत्ती नियोजन व सनियंत्रण समितीतील खालिल प्रतिनिधींची नियुक्ती करीत आहोत. (४ प्रतिनिधीपर्यंत)

Scanned by CamScanner

## ठराव क्र.२ - (पर्याय-२)

ज्या अर्थी बांबूसह सर्व गौण वनउत्पादनांची मालकी पंचायत आणि ग्रामसभेकडे विहित करण्यात आली आहे.

म्हणून आम्ही ग्रामसभेचे मतदार असा ठराव करतो की, आमची ग्रामसभा बांबूची कापणी व विक्री खरेदी, वाहतूक आणि विल्हेवाट स्वतः करेल.

पुढे आम्ही असाही ठराव करतो की, आमच्या गावाची/ग्रामपंचायतीची बांबू कापणीयोग्य असलेली क्षेत्र निश्चित करीत आहोत आणि बांबू कापणी व विक्रीसाठी, वनविभाग आणि इतर सर्व संबंधित विभाग आवश्यक ते सर्व तांत्रिक व इतर सहाय्य ग्रामसभेला करण्याची मागणी करीत आहोत.

***

Scanned by CamScanner